**सं.फौ.प्र.क्र./१९७/२०२१**
**सरकार–वि– कैलाश**
**नि.क्र. ०९ वर पुढे सुरु**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०२
मी शपथेवर खरे सांगतो की,
नावः – ज्ञानेश्वर मारोती राखडे, वय ५४ वर्ष,
कामधंदा –नोकरी, रा. सेंदरवाफा, तह. साकोली, जि. भंडारा.

**साक्षीदाराचा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी अधिवक्ता श्री. एन. के. गणवीर यांच्यामार्फत**

मी भंडा–याला जात असतांना तेली नालयाजवळ भंडारा ते साकोली रस्त्यावर पोलीसांनी माझ्या सहया घेतल्या होत्या. पोलीसांनी माझ्या कशासाठी सहया घेतल्या मला माहिती नाही. मला अभिलेखावरील सुचनापत्र आणि घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी पंच क्र.१ म्हणून सही असून मजकुर माहिती नाही. . त्यांना अनुक्रमे **नि.क्र.११ आणि १२** देण्यात येते.

सरतपास समाप्त

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने न्यायालयाच्या परवानगीने साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे दिनांक ३०/१२/२०२२ रोजी पोलीसांनी मला राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वर तेली नाल्याजवळ पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ कार्यवाही करुन पंचनाम्यावर माझी सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा माझ्यासमक्ष तयार करण्यात आला होता व माझी सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे अधिवक्ता श्री. पी. एम.अंबादे यांनी नाकारला.**

**उलटतपास समाप्त.**

**फेरतपास काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत
VISHAL MAHANAND GAIKWAD
Digitally signed by VISHAL MAHANAND GAIKWAD
Date: 2024.08.12 15:49:24 +0530
(व्ही.एम. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, साकोली.
०९/०८/२०२४